५०६०/६९

क्र. : माध्य. ३ /१५/ ५ वी ते ~~७ वी~~ / पुवि / २००२

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे -१, यांचे कार्यालय

दिनांक : 20 FEB 2002

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे

विषय - इ. ५ वी ते ~~७ वी~~ चे वर्ग माध्यमिक शाळेत सुरू करण्यास परवानगी देणेबाबत.

शाळा : - न्यू. इंग्लिश स्कूल, कोलवडी, ता. हवेली, जि. पुणे.

संदर्भ :- आपले पत्र क्र. शिक्षणा/माध्य/ई-४/५वी/२००१-०२, दिनांक १७.१.२००२

उपरोक्त विषयाधीन संदर्भाच्या पत्रान्वये कळविण्यात येते की, सन १९८३-८४ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी दिलेल्या नवीन माध्यमिक शाळांना इ. ५ वी ~~ते ७ वी~~ चे वर्ग नव्याने सुरू करण्यास परवानगी देण्याबाबत शासनाचे पत्र क्र. एसएसएन/~~१०८५ / २३४८५ / (२४४ एम)~~ १०९७/[५३८/९९] माशि-१, दिनांक ~~२९-१-८६ व २०-१२-८८~~ १.३.१९९९ च्या शासन आदेशानुसार विभागीय शिक्षण उपसंचालकांना अधिकार प्रदान केलेले आहेत.

२/- सदर अधिकारांच्या अधिन राहून, खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर रयत शिक्षण संस्था, सातारा या संस्थेच्या - न्यू. इंग्लिश स्कूल, कोलवडी, ता. हवेली, जि. पुणे. या माध्यमिक विद्यालयांत इ. ५ वी ~~ते ७ वी~~ चे वर्ग सुरू करण्यास सन २००२-०३ या शैक्षणिक वर्षापासून विना अनुदान तत्त्वावर परवानगी देण्यात येत आहे.

अटी - १) इ. ५ वी ~~ते ७ वी~~ चे वर्गाची परवानगी ही विनाअनुदान तत्त्वावर राहील.
२) मा. शा. संहिता नियम ३.२ नुसार सर्व अटींची पूर्तता शाळेने करणे आवश्यक आहे.
३) वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश / नियम संस्थेवर बंधनकारक राहतील.
४. दिनांक १.३.१९९९ च्या शासन निर्णयातील अटी बंधनकारक राहतील.

वरीलप्रमाणे संबंधितांस कळवावे. शाळेने सुरू केलेल्या सदर वर्गाची तपासणी वार्षिक तपासणीचे वेळी करावी व त्याबाबातचे योग्य ते अभिप्राय तपासणी अहवालामध्ये नमूद करावेत.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे -१ करिता

प्रत - १) मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय, विस्तारभवन मुंबई ३२, यांना सविनय सादर

२) मुख्याध्यापक, न्यू. इंग्लिश स्कूल, कोलवडी, ता. हवेली, जि. पुणे.

३) निवड नस्ती, माध्यमिक शाखा, हेच कार्यालय.